## जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

दुरध्वनी क्रमांक – 0712-2565049
ई मेल – dycollrevenuengp@gmail.com वेबसाईट :- http://nagpur.nic.in

क्र/राजस्व/सीआर-31/ब-1/कावि-1567/2017 दिनांक 30/10/2017.

विषय :- जमिन-नागपूर जिल्हा.
प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बेघरांसाठी घरकुल बांधकामाकरिता पाटबंधारे विभाग, नागपूर यांचे मालकीची मौजा काटोल येथील जागा नगर परिषद, काटोल यांना देण्यासाठी महसूल विभागास हस्तांतरीत करण्याबाबत.

संदर्भ :-1) शासन, महसूल व वन विभाग यांचे निर्णय क्र.जमीन-2016/प्र.क्र.213/ज-8, दिनांक 19/09/2016.
2) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.जमीन/कार्या 9(4)/सिआर-32/2017/कावि-617, दिनांक 17 ऑक्टोबर, 2017.

आदेश

मौजा काटोल, ता. काटोल, जि. नागपूर यांचे सर्वे क्रमांक 806, आराजी 1.10 हे.आर या जमिनीपैकी 0.11 हे.आर जमीन कमी झालेली असून उर्वरित 0.99 हे.आर जमीन सद्यःस्थितीत लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर अंतर्गत नागपूर पाटबंधारे विभाग (उत्तर) नागपूर अधिनस्त पाटबंधारे उपविभाग, काटोल यांच्या कार्यक्षेत्रात असून त्यावर कुठलेही बांधकाम करण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बेघरांसाठी घरकुल बांधकामाकरिता पाटबंधारे विभाग, नागपूर यांचे मालकीची मौजा काटोल येथील जागा नगर परिषद, काटोल यांना देण्यासाठी महसूल विभागास हस्तांतरीत करण्याबाबत कार्यकारी अभियंता, नागपूर पाटबंधारे विभाग, (उत्तर), नागपूर यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.

मौजा काटोल, ता. काटोल, जि. नागपूर यांचे सर्वे क्रमांक 806, आराजी 1.10 हे.आर या जमिनीपैकी 0.99 हे.आर ही पाटबंधारे विभाग, नागपूर यांच्या मालकीची जमीन मुख्याधिकारी, नगर परिषद, काटोल यांना "प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे-2022" या योजनेकरिता हस्तांतरीत करण्यास शासनाचे संदर्भिय शासन निर्णयास अनुलक्षून मी, सचिन कुर्वे, जिल्हाधिकारी, नागपूर, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील कलम 40 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 मधील नियम 27 मधील तरतूदी तसेच शासन, महसूल व वन विभाग यांचे निर्णय क्र.जमीन-2016/प्र.क्र.213/ज-8, दिनांक 19/09/2016 नूसार रुपये 1/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने कब्जेहक्काची किंमत वसूल करुन खालीलअटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुरी प्रदान करीत आहे.

अटी व शर्ती :-

1) अर्जदार विषयांकित शासकिय जमीन मंजूर प्रयोजनासाठी वर्ग केल्यानंतर, अर्जदार सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 या धारणाधिकाराने धारण करील आणि शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबंध विक्री/देणगी देऊन/अदला बदल करुन/गहाण

ठेऊन/पट्टयाने देऊन/खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणाव्दारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करणार नाही. सदर जमिनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती/संस्था/कंपनी इत्यादीचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अशाप्रकारे कोणताही आर्थिक व्यवहार अर्जदारास करता येणार नाही. तसेच शासनाच्या महसूल विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय सदर जमिनीचे पोटविभाजन करता येणार नाही.

2) अर्जदार विषयांकित शासकिय जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी करील. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायम स्वरुपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

3) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-2016/प्र.क्र.213/ज-8, दिनांक 19/09/2016 मधील अटी व शर्ती अर्जदारास बंधनकारक राहतील.

4) सदर योजनेतील लाभार्थींना मिळालेली घरे अल्प कालावधीत ते विकून जाणार नाहीत, तसेच लाभार्थी आधार क्रमांकाशी निगडीत करुन योजनेचा लाभ दुसऱ्या वेळेस घेतला जाणार नाही, याविषयी अर्जदार यांनी खात्री करावी.

5) जमिनीचा ताबा मिळाल्यापासून 3 वर्षाच्या आत मंजूर प्रयोजनासाठी वापर सुरु करण्यात यावा.

6) विषयांकित जमिनीवर संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विहीत परवानगीने व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास होणे बंधनकारक राहील. तसेच या व्यतिरिक्त आवश्यकतेप्रमाणे अन्य संबंधित विभाग/शासकीय यंत्रणा यांची मान्यता/पूर्वपरवानगी/ना हरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

7) शासकिय जमीन मंजुरीसंदर्भातील इतर नियमित अटी या ठिकाणी लागू राहतील.

8) प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/सूचना या प्रकरणी बंधनकारक राहतील व त्यानुषंगाने आवश्यक खबरदारी/काळजी घेणे बंधनकारक राहील.

9) प्रस्तावित प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही व त्यांच्या वेध वहीवाटीस बाधा येणार नाही याबाबत अर्जदाराकडून दक्षता घेतली जाईल तसेच सदर जागेस पोच रस्ता उपलब्ध करण्याची कार्यवाही मुख्याधिकारी, नगर परिषद, काटोल यांनी करावी.

10) आवेदकास मंजूर जमिनीचा ताबा देण्यापूर्वी तहसिलदार, काटोल यांनी विषयांकित जमीन निवास्यांच्या उपलब्ध असल्याची खात्री करुन सक्षम प्राधिकारी यांचेकडून जमिनीची मोजणी करुन सिमांकन निश्चित करावी व नंतरच उक्त जमिनीचा ताबा आवेदक विभागाला देण्यात यावा व महसूली अभिलेखात आवश्यक नोंदी घेण्याची कार्यवाही सुध्दा तहसिलदार, काटोल यांनी करावी.

11) मंजूर करण्यात आलेल्या प्रश्नाधिन जमिनीवर अतिक्रमण होण्यापासून संरक्षण करण्याची तसेच अतिक्रमण झाल्यास ते हटविण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

12) "प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे-2022" या योजनेकरिताचा जमिनीचा उपयोग संपुष्टात आल्यास सदरचे क्षेत्र तात्काळ महसूल विभागाकडे कोणत्याही अटी/शर्ती शिवाय विनामूल्य परत करतील व सदर जमिनीचे विल्हेवाट लावण्याचा अधिकार महसूल विभागास राहील.

13) प्रस्तावित जमिनीची महसूली अभिलेखात आवश्यक नोंदी घेण्यापूर्वी आवेदकाकडून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील शासन, महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31 डिसेंबर, 2015

मा अन्य कागदपत्रांमध्ये नमूद नमुना एक-अ नुसार जमीन प्रदानाच्या करारनामा नोंदणीकृत करण्यास उपविभागीय अधिकारी, काटोल यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

14) वरिल अटी/शर्तीपैकी कोणत्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास शर्तभंगाबाबत सदर शासकीय जमीन शासनजमा करण्याचा अधिकार शासनास राहील.

15) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 व त्या अंतर्गत नियमातील संबंधित तरतूदी आवेदक विभागास बंधनकारक राहतील.

(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी व्दारा स्वाक्षरी)

स्वा/-
(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी, नागपूर

प्रत :- 1) मा. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीकरिता सादर.

2) मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर (जमीन शाखा) यांना माहितीकरिता सविनय सादर.

3) कार्यकारी अभियंता, नागपूर पाटबंधारे विभाग, (उत्तर), नागपूर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस.

4) उपविभागीय अधिकारी, काटोल यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.

5) अधिक्षक भूमि अभिलेख, नागपूर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.

6) तहसिलदार, काटोल यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस तसेच आपण सदर आदेशात नमूद केल्याप्रमाणे मंजूर केलेल्या जागेचा ताबा आवेदक विभागास देवून शासकिय रेकॉर्डवर दुरुस्ती करून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

7) मुख्याधिकारी, नगर परिषद, काटोल यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

8) उपनिरीक्षक भूमि अभिलेख, काटोल माहिती तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.

9) निवडनस्ती.

(सुभाष न. चौधरी)
उपजिल्हाधिकारी (महसूल)
जिल्हाधिकारी, नागपूर
करिता